(Marathi)

1022
9/21

1319

67 B

Marathi cell copy
1319

# कय्यूर हुतात्म्यांची वीरकथा

1319
Mar

लोक–प्रकाशन संस्था,

मुंबई नं. ४.

किंमत ४ आणे



"तुम्हीं पार्टीच्या वाढत्या ताकदीची आनंदाची बातमी सांगितलीत. आतां आह्मीं द्विगुणित शक्तीनें फांसावर चढूं."

--मडत्तिल अप्पू

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1319
Date 11.1.72
GOVT. OF INDIA
SERIAL RECORDS
6
9.9.43
Department



"आम्हांला आणखी जन्म असते तर मायभूमीकरतां लढतां लढतां आम्हीं पुनः पुनः मरण पत्करलें असतें."

--चिरूकंडन

"Kayyur Hutatmyanchi Veerkatha"
i.e. (Heroic story of the Kayyur Martyrs)

# कय्यूर वीरांना लाल सलामी (Marathi)

(बंगालमधील हुगळी जिल्ह्याच्या कॉम्रेडसनी आपल्या कय्यूर भाईंना पाठवलेला कवितामय संदेश) Govt of Bombay

अनुवादकः—रा. म जांभेकर

3 copies 1943

विजयि भाइहो तुम्हां सलामी ।
दुनिया सारी लाल रंगली ॥
दलित जनांच्या रुधिरिं नहाली ।
वज्रमुष्टीची जणू सलामी ॥
नया उषेला देण्यालागीं ।
तुम्हां भाइहो, लाल सलामी ॥ १ ॥
मायभूमीच्या सीमेवरती ।
रक्तपिपासू फॅशिस्टांची ॥
गृध्रें पूर्वेला वावरती...... ।
नसानसांतुनि तुमच्या रक्तीं ॥
शत्रूविनाशीं लहरे स्फूर्ति ।
तुम्हां भाइहो, लाल सलामी ॥ २ ॥
तुमच्या स्फूर्तीने दरवळलीं ।
जनसंमर्दीं हृदयें सारीं ॥
घेतिल तुमचे कार्य शिरावरी ।
अमरधैर्यता दावुनि संगरीं ॥
जन-जगाच्या रणभूमीवरी ।
निनाद उठतीः लाल सलामी ॥
भीती आतां जना कुणाची ? ।
शंका नुरली मनीं कशाची ॥ ३ ॥
पांचावरि धारण शत्रूची......।
मशाल वाहिल दुनिया तुमची ॥
त्यागीं तुमच्या जनविजयाची ।
घुमते नांदी नया मनूची ॥
तुम्हां भाइहो, लाल सलामी ॥ ४ ॥

# कय्यूर वीरांसमक्ष पार्टीची शपथ

"तुम्हीं जो बावटा इतक्या शौर्यानें फडकाविला तो तसाच फडकत ठेवण्याची, तुम्हीं जी लढाई इतक्या बहादुरीनें लढलां, ती अखेरपर्यंत लढण्याची आम्हीं १७ हजार पार्टी–कार्यकर्तें आज शपथ घेत आहोंत. आमच्या देशाच्या स्वातंत्र्याच्या व कल्याणाच्या अमर ध्येयासाठीं तुम्हीं आज बलिदान करीत आहांत...पार्टी तुम्हांला आज मुकत नसून तुमच्या बलिदानानें आज पार्टीचें नांव अधिक उज्वल होत आहे...तुमच्या बलिदानानें पार्टीची कीर्ती व ताकद वाढणार आहे...आम्हीं सगळे १७ हजार पार्टी–कार्यकर्तें, तुमची कुटुंबें ही आमचीं कुटुंबें आहेत असें समजूं, याबद्दल खात्री बाळगा."

★ ★ ★

आतां क्षणार्ध उरला वाहील रक्त माझें ।
उजळेल लाल त्यानें भवितव्य मायभूचें ॥

—फ्रेंच कम्युनिस्ट पुढारी गाब्रिएल पेरी

★

वीर आहों हाचि बाणा पाठ दाऊं ना कधीं ।
झुंज चाले रोज त्यांशीं भीति कोणा मृत्युची ॥

—कवि मजाज

# कय्यूर हुतात्म्यांच्या परिचयादाखल चार शब्द

गेल्या २९ मार्च रोजीं कय्यूरच्या वीरांना कान्नूरच्या तुरुंगांत फांसांवर लटकवण्यांत आलें. किसान कुटुंबांत जन्मास आलेल्या व कम्युनिस्ट पार्टीनें जोपासलेल्या या ऐन पंचविशींतील तरुणांना बलिदान करावें लागलें. आज परकीय फॅशिस्ट शत्रू आपल्या वेशीवर टपून बसला असतां त्याच्याशीं रणांगणांवर झुंजत धारातीर्थीं पडण्याऐवजीं त्यांना अशा तऱ्हेचें मरण यावें याहून दुसरी संतापजनक घटना नाहीं. या थोर हुतात्म्यांचा वृत्तांत ऐकून कोणत्याहि देशभक्ताचें हृदय थरारल्याशिवाय रहाणार नाहीं.

## कय्यूर खटल्याची हकीकत

हे कय्यूरचे चार वीर कोण होते ? या चार वीरांनीं कोणकोणते देशकार्य व जनसेवा केली होती ? त्यांना फांशीची सजा कां फर्मावण्यांत आली ? कय्यूर खटल्याची हकीकत थोडक्यांत अशी आहे. **दक्षिण कर्नाटक** जिल्ह्यांतील **कासारगोड** तालुक्यांत मलबार सरहद्दीजवळील मल्याळी विभागांत कय्यूर हें एक खेडें आहे. तेथील कृषक संघाला ( किसान सभा ) दडपून टाकण्याचा खटाटोप चालू होता. पोलिसांनीं २६ मार्च १९४१ रोजीं कित्येक शेतकऱ्यांच्या घरांच्या झडत्या घेतल्या, कित्येक शेतकऱ्यांस व स्वयंसेवकांस मारहाणहि केली. यावेळीं एका मुसलमान बाईची बेअदबीहि झाली असें म्हणतात. या प्रकारांचा निषेध करण्यासाठीं २८ मार्च रोजीं कय्यूर येथें एक निदर्शन भरवण्यांत आले. या जंगी मिरवणुकींत चार कय्यूर कॉमरेडसनीं पुढाकार घेतला होता. यावेळीं चिरडीस पेटलेल्या शेतकऱ्यांनीं दगड मारून एका पोलिस शिपायास ठार केलें. यासाठीं कय्यूरच्या चार कॉम्रेडसना फांशीची सजा सुनावण्यांत आली. ८ फेब्रुवारी १९४३ रोजीं मंगळूरच्या सेशनकोर्टानें या खटल्याचा निकाल दिला.

पण या चार कय्यूर आरोपींनींच गुन्हा केला होता काय ? याचें उत्तर खुद्द **सेशन जज्जनेंच** आपल्या जजमेंटमध्यें लिहून ठेवलें आहे. ज्यांत अनेक लोकांनीं भाग घेतला आहे अशा निदर्शनांत **प्रत्यक्ष खून कोणी केला याचा निवाडा करणें अशक्य काय आहे व तो माणूस कोर्टापुढें आणलाहि गेला नसण्याचा संभव आहे;** पण हा भयानक खून असल्यामुळें सजा देणें जरूर आहे, अशी त्यांनीं स्पष्ट कबूली दिली आहे. या चार आरोपींना फांसावर लटकवतांना प्रत्यक्ष त्यांनी गुन्हा केला आहे किंवा नाहीं हे सिद्ध करण्याची मुळीं जरूरीच नाहीं असें भारतमंत्री मि. **ॲमेरी** यांनीं स्पष्टपणें

जाहीर केले आहे. सजेचे समर्थन करतांना त्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटांत खालील उद्गार काढले: " एकाद्या व्यक्तीचे प्राणहरण करणारें कृत्य एक किंवा अधिक माणसांच्या हातून समान हेतूच्या सिद्धयर्थ घडून आल्याचें शाबित झाल्यास त्या प्रत्येक माणसावर खुनाचा आरोप लागू होतो. **मग प्रत्यक्ष कोणाच्या हातून खून झाला याचा कधीहि पत्ता लागला नाहीं तरी हरकत नाहीं.** "

मद्रास हायकोर्टानें कय्यूर खटल्याचे अपील फेटाळून लावले. ८ जुलै १९४२ रोजीं फांशीची शिक्षा कायम करण्यांत आली. यानंतर कय्यूर कॉम्रेडसनी कॉ. पी. सी. जोशी यांना पत्र लिहून फॅशिस्टविरोधी प्रतिकाराची घोषणा केली, जोहार दळांत सामील होऊन आम्हीं जपानी फॅशिस्टांशीं रणांगणावर लढत मरण्यास तयार आहोंत म्हणून जाहीर केलें. पण याचा परिणाम कांहींच झाला नाहीं. व्हॉईसरॉय व मद्रासचे गव्हर्नर यांच्यापाशीं केलेला दयेचा अर्ज धुडकावून देण्यांत आला. प्रिव्ही कौन्सिलनेंहि अपीलाची वासलात लावली. कय्यूर कॉम्रेडसना हुतात्म्यांचे मरण पतकरावें लागलें.

## कय्यूर मोहिमेस प्रारंभ

कय्यूर वीरांची फांशीची सजा कायम होतांच त्यांना फांसावरून सोडवून आणण्याचे भगीरथ प्रयत्न सुरू झाले. ज्या कम्युनिस्ट पार्टीनें त्यांची जोपासना केलेली होती तिनें या मोहिमेंत पुढाकार घेतला यांत आश्चर्य कोणतें ? ज्या केरळप्रांतानें हे वीरपुत्र निर्माण केले तेथील कम्युनिस्ट पार्टीनें कायदेशीरपणाचा हक्क प्राप्त होतांच जर कोणती मोहीम हाती घेतली असेल तर ती कय्यूर वीरांच्या सुटकेची होय. **केरळ पार्टीचे सेक्रेटरी** कॉ. **कृष्ण पिल्ले** यांनीं अज्ञातवासांतून बाहेर येतांच एक पत्रक काढून २ आगस्ट हा **अखिल केरळ कय्यूर दिन** म्हणून जाहीर केला. या पत्रकास कॉंग्रेस पुढाऱ्यांचा ताबडतोब पाठिंबा मिळाला. दक्षिण कर्नाटक जिल्ह्यांतील प्रांतिक असेंब्लींच्या व कौन्सिलच्या सभासदांनीं कय्यूरच्या कैद्यांनीं फांशीची सजा रद्द करा अशी गव्हर्नरला विनंती केली. पूर्वीच्या गोपालन डिफेन्स कमिटीवर आणखी कॉंग्रेस पुढारी घेऊन ती विस्तारण्यांत आली. अशा रीतीनें कय्यूरच्या वीरांचे प्राण वांचवण्यासाठीं केरळच्या कम्युनिस्ट पार्टीनें सर्व देशभक्तांना बरोबर घेऊन आपल्या मोहीमेस सुरवात केली. २ आगस्ट रोजीं संबंध केरळप्रांतांत सभा–निदर्शनें झालीं. ८३ ठिकाणीं सभा भरण्यांत आल्या. त्याचप्रमाणें हजारों लोकांच्या सह्यांनिशीं सजामाफीचे कित्येक अर्ज मद्रासच्या सेक्रेटरीएटमध्यें दाखल झाले. **कोचीन**हून ४ हजार सह्यांचा अर्ज, **दक्षिण मलबारां**तून १० हजारांचा, व **चिरक्कल** तालुक्यांतून ३०।३० हजारांचे अर्ज सरकारी दप्तरांत दाखल झाले. २ आगस्टची मोहीम हा एकजुटीचा नमुना होता. **गांधीवादी व मुस्लिम लीगचे पुढारी कम्युनिस्टांच्या खांद्याला खांदा लावून सजा रद्द करण्याबद्दल घोषणा करीत होते.**

. यानंतर कय्यूर कॉम्रेडसना सोडविण्याची मोहिम हिंदी कम्युनिस्ट पार्टीने हातीं घेतली. कय्यूरच्या कम्युनिस्टांना फासावरून सोडवून आणण्यासाठीं आपण कसोशीनें

प्रयत्न केले पाहिजेत, यासाठीं प्रचंड लोकमत तयार केलें पाहिजे असा आदेश तिनें आपल्या सर्व कमिट्यांना दिला. या आदेशानुसार सबंध देशभर पार्टीच्या झेंड्याखालीं कय्यूर मोहीम सुरू झाली. गोपालनला आपण फांसावरून सोडवून आणलें तशी या कॉम्रेडसची आपण सुटका करून घेणार अशा आत्मविश्वासानेंच सबंध देशांतील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनीं या मोहिमेस सुरवात केली होती. देशांतील सर्व देशप्रेमी व पुरोगामी संस्था तींत सामील झाल्या होत्या. यावेळीं राष्ट्रीय पुढाऱ्यांना अटक होऊन देशांत दडपशाही सुरू झालेली होती. अशा परिस्थितींत ट्रेड युनिअन्स, किसान सभा व कित्येक ठिकाणीं स्थानिक मुस्लिम लीगचे पुढारी यांनीं या मोहिमेस हातभार लावून तिला एकजुटीचें स्वरूप आणलें. ठिकठिकाणीं सभा भरविण्यांत येऊन सजा रद्द करा अशी मागणी करणारे ठराव गव्हर्नर–व्हाइसरॉयना पाठविण्यांत आले. जेथें जेथें सभा भरवणें शक्य नव्हतें, तेथें तेथें हजारो सह्यांचे सामुदायिक अर्ज पाठविण्यांत आले. अशा रीतीनें **कम्युनिस्ट पार्टीच्या हांकेला ओ देऊन देशांतील जनतेनें कय्यूर कॉम्रेडसच्या सजामाफीची मागणी केली. आपणाला ललामभूत झालेल्या या वीरांना सोडवण्याची कम्युनिस्ट पार्टीनें शिकस्त केली.**

# ते कोण होते?

कय्यूरच्या या चार वीरांचा अल्पपरिचय करून घेण्यास कोणता वाचक उत्सुक असणार नाहीं ?

कॉ. **मडत्तिल अप्पू** हे कय्यूर केसमधील पहिले आरोपी होत. त्यांचा जन्म खेड्यांतील एका राबणाऱ्या शेतकरी कुटुंबांत झाला होता. लहानशी शेती व ताडी काढणें यांतून त्या कुटुंबाला होणारें उत्पन्न राबणाऱ्या मलबारी शेतकऱ्यांस पुरेसें होतें. ते विवाहित असून त्यांना मुलेंबाळें नाहींत. कॉ. अप्पू यांना मल्याळी भाषा वाचतां येत असून थोडेंफार लिहितांहि येत असे. **१९३७ सालापासून तालुक्यांत होणाऱ्या प्रत्येक राजकीय चळवळींत त्यांनीं भाग घेतला होता. कृषक संघम व स्वयंसेवक चळवळ यांमध्यें ते एक प्रमुख कार्यकर्ते होत.** ते गांवच्या शेतकऱ्यांत इतके लोकप्रिय बनले होते कीं तेथील जमीनदारांवर जरब बसून ते शेतकऱ्यांच्या कुरापती काढण्यास धजत नसत. ३ एप्रिल रोजीं १९४१ रोजीं त्यांना अटक करण्यांत येऊन त्यांचे हालहाल करण्यांत आले.

कॉ. **कुंयंबू नायर** यांचा जन्म एका अत्यंत गरीब कुटुंबांत झाला होता. ते विवाहित असून त्यांना एक मूल आहे. त्यांना थोडेंफार लिहितां वाचतां येत असे. **१९३८ सालीं कृषक संघम स्थापन झाल्यापासून त्यांत ते कसोशीनें कार्य करीत होते.** ७ एप्रिल रोजीं त्यांना अटक झाली. त्यांचे हाल करण्यांत आले. पण एवढ्यावर भागलें नाहीं. कय्यूर प्रसंगापासून त्यांच्या कुटुंबांतील सर्व लोकांचे हाल करण्यांत आले. पोलिसांच्या हस्तकांनीं त्याचें घर लुटलें. कुटुंबांतील सर्व लोकांची राजकीय जागृति झाली असल्यामुळें त्यांनीं या सर्व प्रसंगांस मोठ्या धीरानें तोंड दिलें.

कॉ. **कोयितट्टिल चिरूकंडन** हे दरिद्री मलबारांत देखील फारच गरीब समजल्या जाणाऱ्या कुटुंबांतील आहेत. ते अविवाहित होते. त्यांना थोडेंफार लिहीतां वाचतां येत असे. **१९३८ सालापासून ते राजकारणांत भाग घेत होते. फेब्रुवारी १९४१ मध्यें पलई व त्तिमिरी येथें झालेल्या किसान लढयांत ते प्रमुख कार्यकर्ते होते.** त्यांना एप्रिल १९४१ मध्यें अटक करण्यांत आली.

कॉ. **पल्लिकान अबूवकर** हे गरीब मुसलमान शेतकऱ्यांत जन्माला आले होते. ते अविवाहित असून त्यांना गरीब विधवा आई आहे. ते पुरते साक्षर नव्हते. **ते १९३८ सालापासून किसान चळवळींत आघाडीवर होते.** किसानांच्या मागण्या कलेक्टरापुढें मांडण्यासाठीं म्हणून त्यांच्या तालुक्यापासून मंगळूरपर्यंत काढण्यांत आलेल्या जथ्यांत ते होते. कित्येक किसान लढ्यांत त्यांनीं पुढाकार घेतला होता. या राजकीय कार्याबद्दल त्यांच्या श्रीमंत नातेवाईकांनीं त्यांचा छळ केला, सधर्मीयांनीं त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार पुकारला. हा छळ त्यांनीं मोठ्या धीमेपणानें सहन केला.

## पार्टीच्या झेंडयाखालीं सच्चे किसानपुत्र

कय्यूरच्या वीरांचा हा वृत्तांत ऐकतांच कोणत्याहि देशभक्तास अभिमान वाटल्यावाचून रहाणार नाहीं. ते दक्षिण कर्नाटकांतील कासारगोड. तालुक्याच्या शेतकऱ्यांतील खंदे लढवय्ये व त्यांचे आवडते पुढारी होते. जमीनदार–सावकारांच्या जुलमांविरुद्ध कित्येक किसान-लढे लढवून त्यांनीं लोकप्रियता संपादन केली होती. किसान सभेस त्यांनींच नांवारूपाला आणलें, गांवोगांवी कॉंग्रेस कमिट्या त्यांनींच स्थापन केल्या, स्वयंसेवक चळवळीच्या द्वारा त्यांनीं शेतकऱ्यांस स्वसंरक्षणाचे धडे दिले. ते किसानसुपुत्र होते, खेडुत कुटुंबाच्या नशिबी आलेल्या दारिद्र्यादि सर्व अडचणींस त्यांना तोंड द्यावें लागलें होतें. शिक्षणास तर ते पारखे झाले होतेच पण पुरते साक्षरहि नव्हते. खेड्यांतील वर्गयुद्ध हीच त्यांची शाळा, कम्युनिस्ट पार्टी हीच त्यांची शिक्षक. आणि शेतकरी लढ्यांतूनच त्यांना कम्युनिस्ट पार्टीनें राजकारणाची शिकवण दिली होती. साम्राज्यशाही युद्धाच्या काळांत याच पार्टींत दाखल होऊनच त्यांनीं आपल्या आयुष्याचें चीज केलें. 'कम्युनिस्ट पार्टी झिंदाबाद' हीच घोषणा फांशीच्या तक्तावर चढतांना पुकारून त्यांनीं आपल्या पार्टीची कीर्ती जगाच्या कानाकोपऱ्यांत दुमदुमविली. आपल्या अवघ्या ५ वर्षांच्या राजकीय जीवनांत पार्टीला अजरामर करून सोडलें.

## अखेरचे प्रयत्न

कम्युनिस्ट पार्टीनें चालविलेल्या कय्यूर मोहिमेस देशभर प्रचंड पाठिंबा मिळत होता. गव्हर्नर–व्हाइसरॉयनीं या बाबतींत मध्यें पडून सजामाफी दिली पाहिजे अशी देशाच्या कानाकोपऱ्यांतून मागणी केली जात होती. पण व्हाइसरॉयनें मध्यें पडण्याचें नाकारलें. इतक्यांत तिकडे प्रिव्ही कौन्सिलपुढें कय्यूर आरोपींचे अपील चालवावयास मि. **प्रिट** एम्. पी. हे तयार आहेत अशी कॉ. **बेन ब्रॅडले** यांची तार

आल्यावरून तावडतोब तारेनें अधिकारपत्र देण्यांत आलें. पण प्रिव्ही कौन्सिलपुढेंहि इलाज चालला नाहीं. हायकोर्टाच्या सजेबरहुकुम २९ मार्च रोजीं त्यांना फांसावर चढवण्यांत आले.

# अखेरचे दिवस

व्हाइसरॉयनें दयेचा अर्ज फेटाळल्यापासून या बाबतींतील प्रयत्न यशस्वी होणार नाहींत अशी सर्वत्र संभावना होती. म्हणूनच कय्यूर कॉम्रेडसच्या या अखेरच्या दिवसांत त्यांना ठिकठिकाणाहून कामगारांनीं, शेतकऱ्यांनीं, त्यांच्या संस्थांनीं, देशभक्तांनीं अभिवादनपर संदेश पाठवले. भ्रातृभावाची सलामी देणारीं पत्रें लिहिलीं. यावरूनच त्यांनीं देशभक्तांच्या व स्वातंत्र्यप्रेमी व्यक्तींच्या हृदयांत अढळ स्थान पटकावलें होतें याचा प्रत्यय आला. **महाराष्ट्रांतून** त्यांना ११० हून अधिक देशभक्तांनीं व १५ हून अधिक कामगार–किसान संस्थांनीं अभिवादनपर पत्रें पाठवलीं. **आंध्र**प्रांतांतून २१ हून अधिक कामगार–किसान व कम्युनिस्ट संस्थांनीं त्यांना सलाम पाठवले. **बंगाल**मधून १४ हून अधिक संस्थांनीं त्यांना अभिवादनपर संदेश पाठवले. हावडा जिल्ह्यांत १॥ हजाराहून अधिक स्त्रियांची जंगी सभा भरून कय्यूर कॉम्रेडची फांशी रद्द करण्याची मागणी करण्यांत आली. **इंदोर** येथें कम्युनिस्ट पार्टीच्या स्थानिक कमिटीनें ‘ कय्यूर दिन ’ पाळला. “ तुम्हीं ज्या कार्यासाठीं आपल्या प्राणांचें बलिदान देत आहांत तें कार्य पुढें चालू ठेवण्याची आम्ही शपथ वहातों ” अशी घोषणा करणारें एक पत्र कय्यूर कॉम्रेडसना पाठविण्यांत आलें. **संयुक्तप्रांतांत देहेराडून** येथें कम्युनिस्ट पार्टीच्या जिल्हा कमिटीनें भरवलेल्या प्रचंड सभेंत असा ठराव करण्यांत आला कीं, “ कय्यूर कॉम्रेडसनीं फांशीच्या दारांतून पाठवलेल्या संदेशामुळें समग्र जनतेला देशरक्षणासाठीं लढण्याची स्फूर्ति मिळेल. ” एकट्या देहेराडून शहरांतून कय्यूर कॉम्रेडसना ८ पत्रें गेलीं. एक तरुण विद्यार्थी आपल्या पत्रांत म्हणतो: “ तुमचा त्याग व तुमचें धैर्य मला आदर्शवत् आहे. तुमच्या संदेशांतील शब्द न शब्द प्रत्येक हिंदी माणसाला देशरक्षणासाठीं प्राणाची आहुति देण्यास स्फूर्ति देईल. ”

# केरळ कम्युनिस्टांची प्रतिज्ञा

खुद्द **केरळ** प्रांतातून कम्युनिस्ट पार्टीतर्फे कॉ. **कृष्ण पिल्ले** यांनीं पुढील संदेश पाठवला.

“ आपलें कर्तव्य पार पाडतांना मृत्युला तोंड देण्यास कोणताही बोल्शेविक कधीं कचरत नाहीं. आपल्या कर्तव्यस्थानी खडे राहून आपल्या प्राणाचे बलिदान करणाऱ्या कॉम्रेडबद्दल कोणताहि बोल्शेविक कधी दुःखाश्रू ढाळीत नाहीं. आपण कम्युनिस्ट, मातृ-भूमीच्या स्वातंत्र्यासाठीं व आपल्या देशबांधवांच्या दास्यमोचनासाठीं लढत आहोंत व कार्याप्रीत्यर्थ एकदां नव्हे तर जरूर पडल्यास शंभरदां आपण आनंदानें मृत्यूला तोंड दिलें पाहिजे.

" तुमच्या शौर्याची व त्यागाची पवित्र स्मृति आम्हांला चिरंतन स्फुरण देईल असें आम्ही तुम्हांला आश्वासन देतों. तुम्हीं हातीं घेतलेलें महत्त्व देशकार्य आमच्या रक्ताचा अखेरचा थेंब सांडेपर्यंत चालू ठेवण्याची व पुरें करण्याचीं आम्हीं शपथ वाहतों.

" लाल सलाम ! "

या अखेरच्या दिवसांतच **हिंदुस्थानच्या कम्युनिस्ट पार्टीचे सेक्रेटरी** कॉ· **पी. सी. जोशी** हे मलबारच्या दौऱ्यावर असतां त्यांनीं कान्ननूर जेल-मध्यें त्यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीचा हृदयस्पर्शी वृत्तांत कॉ. पी. सी. जोशी यांच्या लेखांत आला आहे. कय्यूरच्या वीरांनीं आपलें धैर्य कधींहि खचूं दिलें नाहीं. ज्या दिवशीं पहाटे त्यांना फांसावर चढवण्यांत आले त्याच्या आदल्या रात्रभर कान्न-नूरच्या जेलमधून क्रांतिकारक गाण्यांचे व घोषणांचे आवाज बाहेर ऐकूं येत होते. यांच्या द्वारेंच त्यांनीं बाहेरील जनतेस धीर दिला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ३ हजार नागरिकांच्या जमावानें त्यांच्या शवांची मागणी केली. पण ती धुडकावून लावण्यांत आली. यानंतर प्रचंड निषेध–सभा भरविण्यांत आली. तींत सर्वपक्षीय पुढारी सामील झाले होते.

# कय्यूर हुतात्म्यांच्या स्मृत्यर्थ

या निषेधाचा प्रतिध्वनि हिंदुस्थान देशाच्या कानाकोपऱ्यांत उठल्याशिवाय राहिला नाहीं. कय्यूरचे वीर गेले याबद्दल कोणत्याहि देशभक्ताच्या मनांत विषाद व व संताप उत्पन्न झाल्याशिवाय रहाणार नाहीं. ज्या जपानी फॅशिस्टांचा प्रतिकार करण्यास आम्हीं तयार आहोंत अशी कय्यूरच्या वीरांनीं तुरुंगांतून घोषणा केली, त्यांच्या प्रतिकारार्थ राष्ट्रीय एकजूट घडवून आणूनच त्यांच्या स्मृतीला जागल्यासारखें होणार आहे. त्यांना देशरक्षणकार्यांत भाग घेतां आला नाहीं हें आपल्या गुलामगिरीचें द्योतक होय. चालू स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेऊनच आपणाला ह्या गुलामगिरीचा कलंक कायमचा धुवून टाकतां येणार आहे. राष्ट्रीय एकजूट हीच स्वातंत्र्यप्राप्तीची गुरूकिल्ली आहे. कय्यूरच्या वीरांची जिनें जोपासना केली, तिच्या जयघोषांत त्यांनीं मोठ्या धीरानें फांशीच्या तक्तावर पाऊल ठेवलें ती कम्युनिस्ट पार्टी एकजूट घडवून आणण्याची शिकस्त करीत आहे. तिनें दाखवून दिलेला स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग आक्रमणें हें प्रत्येक हिंदी देश-भक्ताचें कर्तव्य होय. आणि त्याला ते पार पाडण्यास प्रवृत्त करण्यासाठींच आम्ही कॉ. पी. सी. जोशी यांच्या मुलाखतीचा वृत्तांत, फांशीची सजा हायकोर्टानें कायम केल्यानं-तर कय्यूरच्या वीरांनीं त्यांना लिहिलेलें पत्र त्याचप्रमाणें व्हाइसरॉयनीं दयेचा अर्ज नाकारल्यानंतर त्यानीं पाठविलेला संदेश, व बंगालच्या एका कवीनें त्यांना उद्देशून केलेल्या अभिवादनपर कवनाचे रूपांतर इ. गोष्टी संकलित करून या लहानशा पुस्तकांत छापीत आहोंत. त्या प्रत्येक देशभक्तास स्फूर्तिदायक होतील अशी आमची खात्री आहे.

कॉ. पी. सी. जोशी

# कय्यूरच्या वीरांशीं माझी अखेरची मुलाखत

**कय्यूर कॉम्रेडस या नांवाने प्रसिद्धीस आलेल्या चार तरुण किसान वीरांना ता. २९ मार्च रोजीं फांशीं देण्यांत आले.** त्यांचीं नांवें **मडत्तिल अप्पू, कुयंबू नायर, चिरूकंडन, अबू बकर** अशी होती. ते सर्व ऐन पंचविशीच्या आंतले तरुण होते. त्यांना फारसे लिहिता वाचतां येत नसले तरी ते आपल्या खेड्यातल्या जनतेचे पुढारी होते. त्यांनीं काँग्रेस कमिट्यांची संघटना करण्यांत पुढाकार घेतला होता. ते स्वतः काँग्रेस स्वयंसेवक दलात सामील झाले होते. त्यांच्याच प्रयत्नांनीं किसान सभा स्थापन झाली होती. या तालुक्यांतील शेतकऱ्यांना कोणचेही कुळांचे हक्क नव्हते. त्यांनी किसानांत जागृती करून तेथें जोरदार किसान चळवळ निर्माण केली होती. ते कडवे देशभक्त होते म्हणून पोलिसांचा त्यांच्यावर राग होता; किसानांत जागृती निर्माण करून त्यांची संघटना करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला म्हणून जमीनदार त्यांच्याविरुद्ध चिडलेले होते.

## त्यांना फांशी देण्याचें कारण

या भागांत मलबार स्पेशल पोलिसांची एक तुकडी ठेवण्यात आलेली होती. या पोलिसांनीं शेतकऱ्यांच्या घरांची झडती घेण्याचे निमित्त करून लूटमार केली. त्यांनी किसान कार्यकर्त्यांना तपासणी करण्यासाठीं पकडून त्यांना बेदम चोप दिला. या झोटिंगशाहीचा निषेध करण्यासाठीं कय्यूरमध्यें निदर्शन करण्याचे ठरले. याचदिवशीं तेथें एका कॉन्स्टेबलची स्वारी आली. या राजेश्रींना पाहिल्याबरोबरच लोकांना संताप आला होता. तशांत त्या पोलिसानें एका मुसलमान शेतकरी स्त्रीची बेअदबी करण्याचा प्रयत्न केला असें म्हणतात. मग मात्र तेथें जमलेल्या किसानांचा संताप अनावर होऊन त्यानीं त्या पोलिसाला दगडानीं ठेचून मारलें. यासाठींच वरील चार कॉम्रेडसना फांशी देण्यांत आले आहे.

अशा प्रकारच्या दंगलीत अनेक लोकांनीं भाग घेतला असल्यामुळें प्रत्यक्ष मर्मांतिक आघात कुणी केला हें शोधून काढणें कठीण आहे व बहुशः हे कृत्य करणारा इसम कोर्टापुढें आलेलाच नाहीं, अशी कबूली खुद्द सेशनजज्जानीं देखील दिली होती. तरी त्यानी शिक्षा देण्यास मात्र मागेंपुढें पाहिलें नाहीं.

हायकोर्टानें त्यांचे अपील तडकाफडकी फेंटाळून लावलें. हें ऐकून मलबारच्या जनतेला धक्का बसला. जिल्ह्याच्या सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं व असेंब्लीच्या सर्व सभासदांनी दया दाखविण्याबद्दल मद्रासच्या गव्हर्नरांना विनंति केली. सर्व प्रांतभर यासाठीं चळवळ झाली, पण गव्हर्नरांच्या मनावर तिचा कांहीं परिणाम झाला नाहीं.

## त्यांचे हृदयस्पर्शी पत्र

मलबारच्या जनतेची पुनः एकदां निराशा झाली. पण लवकरच कय्यूर कॉम्रेडसची फांशीची शिक्षा रद्द करण्याच्या मागणीची चळवळ सर्व देशभर पसरली. देशाच्या कोनाकोपऱ्यांतून हिंदुस्थानसरकारला मध्यस्ती करण्यासाठीं विनंति करण्यात आली. त्यानीं स्वतः मला एक अत्यंत हृदयस्पर्शी पत्र लिहिलें. **जेव्हां ते आमच्या पार्टीत सामील झाले, तेव्हांच त्यानीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मरेपर्यंत लढण्याची शपथ घेतली होती; ते मरणाला भीत नव्हते; पण मातृभूमीवर फॅशिस्ट चढाईचें संकट आलें असतांना रणांगणावर लढतां लढतां मरण येण्याऐवजीं फांशीचे मरण पत्करावे लागत आहे, याबद्दल त्याना दुःख वाटत होते.** मी सरकारला खास विनंती केली. त्यांची सुटका झाल्यास त्यांना सैन्यात दाखल करण्यास किंवा जपान्यांच्या पिछाडीवर पाठविण्यास तयार असल्याचे मीं त्यांना कळविलें. त्यांच्यासारखे बहाद्दर सैनिक कोठच्याहि सैन्याला ललामभूत झाले असते. पण माझी विनंती फुकट गेली. कारण हे सरकार आमचे नव्हते. या सरकारला आपल्या नेहमीच्या चाकोरीबाहेर पडण्याची भीती वाटली. कय्यूर वीरांना सोडल्यास एक नवीन पायंडा पडेल अशी त्यांना धास्ती पडली. "कायदा व सुव्यवस्था या मंत्राची गुलामी त्यांना झुगारता आली नाहीं."

## ब्रिटिश कॉम्रेडसची खटपट

यानंतर कय्यूर वीरांची शिक्षा रद्द करण्याचा लढा अयशस्वी ठरणार हे जवळ जवळ निश्चितच होते. पण मातृभूमीच्या सेवेसाठीं त्यांना वांचविण्याची शेवटची आशा नष्ट होईपर्यंत प्रयत्न करण्याचे आम्ही ठरविलें. प्रिव्ही कौन्सिलसमोर अपील करण्यात आले. यासाठीं आमच्या ब्रिटिश कॉम्रेडसनी खटपट केल्यामुळें मि. डी. एन. प्रिट यांच्यासारख्या नामांकित वकिलानें फुकट काम करण्याचे कबूल केले. पण याचा देखील उपयोग झाला नाहीं.

अखेर आमच्या ब्रिटिश कॉम्रेडसनीं शेवटचा निर्वाणीचा प्रयत्न देखील करून पाहिला. कांहीं मजूर पक्षाचे व नेमस्त पक्षाचे पार्लमेंटचे सभासद व धार्मिक पुढारी यांनीं बादशहांना अपील केले. पण हे अपील देखील फुकट गेले.

हिंदी किसानांचे हे चार लढवय्ये सुपुत्र आज दिवंगत झाले आहेत. ज्या ज्या हिंदी देशभक्ताला त्यांची तेजस्वी कथा कळली, त्यानें त्यांच्या बचावासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सात समुद्रांच्या पलीकडील ब्रिटिश कामगारांनीं त्यांना आपलें सहोदर

समजून वांचविण्यासाठीं धडपड केली. ब्रिटिश जनतेच्या सुपुत्रांनीं आमच्या या चार कॉम्रेडसना आपलेच देशबांधव समजून, त्यांच्या बचावासाठीं जे जे करणें शक्य होतें तें केलें.

**हे चार कॉम्रेडस आमच्या मायभूमीचे सच्चे पुत्र होते. त्यानीं साम्यवादाचा–अखिल मानवतेच्या ध्येयाचा–अंगिकार केला होता. तरुणपणींच ते जगाच्या प्रत्येक देशांत लढणाऱ्या अजिंक्य स्वातंत्र्यवीरांच्या फौजेत–कम्युनिस्ट पार्टींत सामील झाले होते. ते कडव्या देशभक्तांप्रमाणें लढता लढता जगले. शेवटीं स्वातंत्र्य-वीराना साजेल असे हुतात्मांचे मरण त्यांना आले.**

**" कय्यूर कॉम्रेडस झिंदाबाद "**

मलबार प्रांतात आमची पार्टी ही सर्वांत वजनदार पार्टी आहे. तेथें लालबावटा फक्त शहरांतच नसून शेकडो खेड्यापाड्यामधूनहि डौलाने फडकत आहे. पार्टीच्या ३००० सभासदांपैकीं बहुतेक किसान आहेत. यापैकीं सोळा आज जन्मठेपेची शिक्षा भोगीत आहेत व चौघाना फांशीची शिक्षा झाली होती.

## माझी फारा दिवसांची इच्छा

जेव्हां पार्टीच्या मध्यवर्ती कमिटीनें आपला प्रतिनिधी म्हणून मलबार प्रांतिक परिषदेस जाण्याचा मला आदेश दिला, तेव्हां बरेच दिवसाची माझी इच्छा पूर्ण होणार याबद्दल मला हर्ष झाला. आमच्या पार्टीचे काम खेडयापाडयातून कसे चालले आहे, हे आपल्या डोळ्यांनीं पाहण्याची माझी फार इच्छा होती.

जेव्हां पार्टीच्या मध्यवर्ती कमिटीनें कय्यूर कॉम्रेडसना भेटून त्यांना पार्टीतर्फे शेवटचे अभिवादन करण्याची व कय्यूरला जाऊन या चार कॉम्रेडसच्या कुटुंबाना सहानुभूतीचा संदेश देण्याची मला आज्ञा केली, तेव्हां आपण या महत्वाच्या कामगिरीसाठीं जात आहोंत याबद्दल मला अभिमान वाटला.

कालिकतची पार्टीपरिषद संपल्याबरोबर लगेच आम्हीं कान्ननूरला गेलों. तिथें भर दुपारी भरलेली कामगारांची व शहरवासियांची रॅली आटोपतांच 'कय्यूर कॉम्रेस झिंदाबाद' या प्रचंड घोषणेच्या निनादात मोटारीनें आम्ही सेंट्रल जेलकडे गेलो. कितीतरी वेळपर्यंत वरील घोषणेचे पडसाद आमच्या कानांत घुमत होते. आम्हीं जेलकडे जात आहोंत, असे कॉ. पिल्ले–आमचे मलबार सेक्रेटरी–यानीं त्यांना सांगितलें होतें.

जेलच्या दरवाजासमोर आमची मोटार थांबली. इतर जेलसारखाच तोहि एक जेल दिसत होता व इतर ठिकाणाप्रमाणेंच त्याचाहि लोखंडी दिंडी–दरवाजा आमच्यासाठीं उघडला गेला. आम्हीं बरेच खाली वांकून आत शिरलो व तेथील रजिस्टरवर सही केली. जेलरच्या मागोमाग आम्हीं चालू लागलो.

## त्यांची लाल सलामी

पहिल्याच चार कोठड्यांत ते चौघेजण होते. आपल्या मुठी वळून, ताठ उभे राहून " लाल सलाम " असें म्हटले. चारी कोठड्यासमोरून हिंडून मी पुन्हा मध्यभागीं

येऊन उभा राहिलो व वर पाहिलें. **ते किती तरुण व सोज्वल दिसत होते ! सुमारे वर्षभर फांशीवाल्या कैद्यांच्या अंधारकोठड्यांत काढावी लागल्यामुळें त्यांची शरीरें थोडीशी कृश झालेली असलीं तरी त्यांच्या चेहऱ्यांवर निश्चयाचें तेज झळकत होतें. त्यांच्याकडे पाहतांक्षणीच हे बहादुर तरुण 'कम्युनिस्ट पार्टी झिंदाबाद' अशीं घोषणा करीत दमदार पावलांनीं फांशीच्या तक्तावर चढतील, अशी मला खात्री वाटली.**

हिंदुस्थानांतच्या जवळ जवळ सर्व भाषामधून लिहिलेल्या कार्डांचे व पत्रांचे एक बंडल आम्हीं बरोबर नेले होते. कामगार, शेतकरी विद्यार्थी, विद्यार्थिनी यानीं घरगुती व प्रेमळ भाषेंत लिहिलेलें ते अभिवादनाचे संदेश होते. ते पाहून त्या वीरांच्या चेहऱ्यावर हास्य दिसूं लागलें, व इकडे एवढ्या पत्राचे भाषांतर करून ती सेन्सार कशी करायची असा पेंच जेलरच्या तोंडावर दिसूं लागला. पण त्या सर्व पत्रांचें इंग्रजी भाषांतर सोबत जोडले आहे, हे सांगताच जेलरला मोंठे ओझे दूर झाल्यासारखे वाटले.

# शेवटचे अभिवादन

त्यांना इंग्रजी किंवा हिंदुस्तानी समजत नव्हते व मला मल्याळी भाषेत बोलता येत नव्हते. जेलरच्या परवानगीनें कॉ. पिल्ले यानीं माझ्या बोलण्याचे शब्दशः भाषांतर केले. माझ्या नेत्रांतून वाहू लागलेल्या अश्रूच्या लोटामुळें माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडणे शक्य झाले, नाहींतर गळा दाटून आल्यामुळें शब्दहि बाहेर पडण्याची मुष्किल झाली असती. पार्टीच्या वतीनें मी त्याना जे सांगितलें त्याचा सारांश पुढें दिला आहे:—

इतर कोणच्याही सभासदांपेक्षां तुम्हा चौघांबद्दल पार्टीला अत्यंत अभिमान वाटत आहे. ज्यावेळीं पार्टीचे एकंदर सभासद हजाराच्या आंतच होते, त्यावेळीं तुम्हीं पार्टीमध्यें आलांत. आज आमच्या पार्टीचे ९ हजार सभासद व ८००० होतकरू सभासद आहेत. **तुम्ही जो बावटा इतक्या शौर्यानें फडकाविला तो तसाच फडकत ठेवण्याची, तुम्हीं जी लढाई इतक्या बहादुरीनें लढलां, ती अखेरपर्यंत लढण्याची आम्ही १७००० पार्टी कार्यकर्ते आज शपथ घेत आहोत.**

आमच्या देशाच्या स्वातंत्र्याच्या व कल्याणच्या अमर ध्येयासाठीं तुम्ही आज बलिदान करीत आहांत. आमचा लढा न्यायाचा आहे. तो विजयी झालाच पाहिजे. तो विजयी व्हावा यासाठीं तुम्ही आपले प्राण अर्पण करीत आहां. तुम्हीं मरत नसून आपले मनोरथ पूर्ण करीत आहांत, हें आम्हाला माहीत आहे.

आम्हाला अत्यंत प्रिय असलेल्या तुम्हा चौघांना आज पार्टी मुकत आहे. पण तुमच्यासारख्या कॉम्रेडसमुळेंच आज पार्टी एवढी मोठी झाली आहे. जेव्हां तुम्हीं मलबारच्या पार्टीचे सभासद झालात त्यावेळीं ती पार्टी म्हणजे एक तरुण देशभक्तांचा गट होता. आज आमची पार्टी ही तुमच्या प्रांतांतील सर्वांत महत्वाची राजकीय पार्टी झाली आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांतील जनतेचे सच्चे सुपुत्र आज आमच्या पार्टीमध्यें सामील होत आहेत. ज्या ज्या ठिकाणीं पार्टीचे नांव माहीत आहे, त्या त्या ठिकाणीं

तुमची नांवे प्रेमानें व आदरानें उच्चारली जात आहेत. तुमच्या सारखे तरुण हुतात्मे आमच्या पार्टीमधून निर्माण झाले म्हणून कित्येक देशाभिमानी तरुणांना व तरुणीना आमच्या पार्टीचे सभासद होणे म्हणजे बहुमानाची गोष्ट आहे असे वाटत आहे. **पार्टी तुम्हांला आज मुकत नसून तुमच्या बलिदानाने आज पार्टीचे नांव अधिक उज्वल होत आहे.** तुम्हा चौघांना त्यांना खुशाल फांसावर चढवू द्या. आज ते टाळणे शक्य दिसत नाहीं. पण तुम्हा चौघांच्या उज्वल उदाहरणानें उत्साहित झालेले आणखी चारशेच काय, पण चार हजार नवे सभासद आम्हांला मिळतील. हें ते थांबवू शकणार नाहींत. याच्यासाठीं आम्हीं सतत कार्य करीत राहूं; आणि आम्ही शेवटी विजयी होऊं याची खात्री बाळगा.

## तुम्ही पार्टीचे नांव उज्वल केले

**आमचे ध्येय अमर आहे, तसेच आमचे साधनहि–आमची पार्टीहि–अमर आहे. दडपशाहीमुळें आमची ताकद खची होण्याऐवजीं अधिक वाढली आहे. तुमच्या बलिदानानें पार्टीची कीर्ती व ताकद वाढणार आहे. कोणच्याहि कम्युनिस्टाला यापेक्षां जास्त प्रिय गोष्ट कोणची असूं शकते ?**

तुमच्या कुटुंबांतील मंडळींना आज तुम्ही मुकत आहां. पण जेव्हां तुम्ही पार्टींत सामील झालात, तेव्हां जनतेलाच तुम्ही मातापित्यांच्या ठिकाणी मानलेंत, आणि तुमच्या मातापित्यांनी जे हाल व दुःखें सहन केली, तशी इतर हिंदी मातापित्यांना सहन करावी लागूं नये, यासाठी तुम्ही अविश्रांत झटलांत. आम्ही सगळे १७००० पार्टी कार्यकर्ते, तुमची कुटुंबे ही आमची कुटुंबे आहेत असें समजू, याबद्दल खात्री बाळगा. तुमच्या मातापित्यांना, पार्टी हेंच त्यांचें कुटुंब आहे, व प्रत्येक पार्टी सभासद हा त्यांच्या मुलाप्रमाणें आहे, असे वाटण्यासाठी आम्ही वाटेल ते करूं.

तुम्हाला भेटण्याची संधी मिळणें हा माझ्या आयुष्यातला अत्यंत बहुमोल प्रसंग आहे; आणि ज्या पार्टीवर तुम्ही प्राणापेक्षांहि जास्त प्रेम केले, त्या पार्टीनें तुम्हाला अभिवादनाचा संदेश पाठविला आहे, त्याचा स्वीकार करा. येथून मी तुमच्या गांवी जाऊन तुमच्या नातेवाईकांना भेटणार आहे. त्याना कांहीं सांगायचे आहे का ?

"त्यांना धीर द्या, आमच्याबद्दल फिकीर न करण्यास सांगा" असें सगळयानीं एकदम सांगितले.

"आणखी कांही सांगायचं आहे ?" मी विचारलें.

"आमच्या मनांत जे उचंबळून येत होतं ते तुम्ही बोललाच आहांत" असं त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला.

"तसं नाहीं, भेटीचीवेळ संपेतोपर्यंत तुम्ही बोललंच पाहिजे. तुम्ही काय म्हणत होता, ते अक्षरन् अक्षर मी बाहेरच्या लोकांना जाऊन सांगितले नाहीं, तर ते मला

मला फाडून खातील. माझी स्मरणशक्ती चांगली आहे, मी सगळं कांहीं नीट लक्षांत ठेवीन." मी हंसण्याचा प्रयत्न करीत म्हणालो.

## त्यांचा अखेरचा संदेश.

जेलरसाहेब घड्याळाकडे पाहू लागले. मी त्यांना लवकर बोलायची विनंती केली. पहिल्या कोठडीत असलेले कॉ. **कुंयंबू म्हणाले "मी जनतेची जी कांहीं सेवा करू शकलो, ती करण्याची लायकी माझ्यामध्ये पार्टीनेच निर्माण केली. आणि मी माझे कर्तव्य पार पाडले असे पार्टीला वाटत असेल तर माझ्या सर्व आकांक्षा पूर्ण झाल्या असें मी समजतो."**

**कॉ. अप्पू म्हणाले, "तुम्ही पार्टीच्या वाढत्या शक्तीची आनंदाची बातमी आणलीत. आम्ही जातां द्विगुणित शक्तीनें फांशीच्या तक्तावर चढूं. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मरण्यासाठींच आम्ही पार्टीमध्यें सामील झालों होतो.'**

**कॉ. चिरूकंडन म्हणाले, "आम्ही केवळ चार किसानांची मुले आहोंत. पण हिंदुस्थानांत लाखों किसान आहेत. आम्हीं फांशी जाऊ, पण त्या सगळ्यांना नाहींसें करतां येणें शक्य नाहीं. या एकाच विचारानें आम्हाला आजपर्यंत धीर दिला आहे. सगळया देशामधून आलेल्या या पत्रांनंतर, त्यांची आणखी सेवा करण्यासाठीं आम्हांला जगता येत नाहीं याबद्दल वाईट वाटतं. दुसऱ्या कशाबद्दलहि आम्हाला कांहीं सुद्धां वाटत नाहीं. आम्हाला आणखी जन्म असते तर आमच्या ध्येयासाठीं आम्हीं पुनः पुनः देखील मरण पत्करलं असतं." त्यांनीं किसानांच्या दोन लढ्यांस पुढाकार घेतला होता.**

**कॉ. अबू बकर हे शेवटच्या कोठडीत होते. "आमच्या थोर हुतात्म्यांच्या जीवनावरून आम्हाला स्फूर्ती मिळाली. त्यांच्यापैकींच एक होण्याचा मान आपल्याला मिळेल, असे स्वप्नांतदेखील आम्हाला कधी वाटलं नव्हतं. आम्ही फांशीच्या तक्तावर बेडरपणे चढून जाऊ, असे सगळया कॉम्रेडसना सांगा. माझी आई फार म्हातारी आहे, तिला धीर द्या. माझे धाकटे भाऊ अगदी लहान आहेत. त्यांना पार्टी कार्याचे शिक्षण द्या. मी कुटुंबातला कर्ता मनुष्य होतो, आतां त्यांच्याकडे पाहणारे दुसरे कुणीच नाहीं!"**

ते थांबल्याबरोबर जेलरनीं वेळ संपल्याची सूचना दिली. त्यांच्याशीं हस्तांदोलन करण्याची मी जेलरकडे परवानगी मागितली. त्यांनीं ती दिली.

## मानवतेची अमर फुलें!

त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्याशी हस्तांदोलन करणें हा खरोखर थरारून सोडणारा अनुभव होता. ते खरे स्वयंसेवक होते. हस्तांदोलन झाल्याबरोबर त्यांनीं लगेच खड्या तालमींत आपल्या **मुठी वळून लाल सलाम केला.**

कॉ. अप्पूनीं माझे हात जरा जास्त वेळ दाबून धरले व शांतपणें 'कॉम्रेड" असें ते पुटपुटले. पण यापेक्षां त्यांना जास्त बोलता आले नाहीं. मी त्यांच्या डोळ्यांत पाहिले. ते थोडसे ओले झालेले दिसले. मी नजर फिरविली. व्हरांडयाच्या पलीकडे एक कसलासा फुलांचा ताटवा होता. कसलाहि विचार न करतां मी एकदम म्हणालो: "**ती फुले नश्वर आहेत. पण कॉम्रेड, तुम्ही मानवतेची फुलं अजरामर आहांत**" कॉ. पिळ्ळयांनीं ताबडतोब भाषांतर केले. कॉ. अप्पू ते ऐकून बरेच लाजले.

जेव्हां मी कॉ. अबूबकर यांच्याशी हस्तांदोलन केलें, तेव्हां कांहीं केल्या त्यांचे हात मला सोडवेनात. त्यांच्या शूर मोपला पूर्वजांची व त्यांच्या वीरकृत्यांची मला आठवण झाली. त्यांच्यापैकींच एक, आज या चार हुतात्म्यामध्यें होता आणि तरी देखील आमचे हिंदू देशभक्त मुस्लिम देशबांधवांच्या देशभक्तीबद्दल अविश्वास बाळगत असतात. मी जोपर्यंत तिथें रेंगाळलों होतो तोपर्यंत ते सारखे "लाल सलाम कॉम्रेड" असे पुन: पुन: म्हणत होते. त्यांच्या चेहऱ्याची ठेवण अत्यंत रेखीव होती व त्यांच्या नजरेंत देशभक्तीची तळमळ लकाकत होती.

## त्यांनीं मलाच धीर दिला

जेव्हां आम्ही परत निघालो, तेव्हां दोन्ही बाजूनी पुन्हा वळलेल्या मुठी वर उच-लल्या गेल्या. आम्ही आंत आलो त्यापेक्षां कितीतरी हलक्या पावलांनीं बाहेर जात होतो! आम्हाला केवढं हलकं वाटत होतं. असले बिनतोड कॉम्रेडस लाभल्याबद्दल केवढा अभि-मान वाटत होता आम्हाला!

जेव्हां आम्ही जेलच्या बाहेर पडलो, तेव्हां इतका वेळ विचारांत गढून गेल्यामुळें स्तब्ध असलेले कॉ. सुंदरय्या मला म्हणाले, "तुम्ही त्यांना धीर देण्यासाठीं गेलांत, पण उलट त्यांनींच तुम्हाला धीर दिला."

"**ते हुतात्मे वीर आहेत. त्यांना धीर देण्याची जरूरी नव्हती. मी त्यांचा मागे राहिलेला कॉम्रेड आहे. मलाच धीराची गरज होती, तो मला मिळाला.**" एवढेच उत्तर मला देता आले.

आमची मोटार झपाट्याने स्टेशनकडे जात होती. आम्हाला **चरपत्तर**ची गाडी पकडावयाची होतीं व तेथून नदीमार्गानें बोटींत बसून या कॉम्रेडसच्या कुटुंबांतील मंडळीना भेटण्यासाठीं कय्यूर गावीं जायचे होते. माझ्या कय्यूरच्या भेटीबद्दल मी पुढच्य आठवड्यांत लिहीन.

माझा मलबारचा दौरा २६ मार्चला पुरा झाला. कालिकत येथें पोचतांच आमचे मद्रासचे सेक्रेटरी, कॉ. मोहन यांची तार मला मिळाली, "ब्रिटिश सरकारनें म—

करण्याचें नाकारलें आहे. फांशीची तारीख लवकरच ठरविली जाईल" असे त्या तारेत लिहीले होते.

# शेवटचे लाल प्रणाम !!

मी हें लिहींत असतानाच मलबारहून नुकत्याच आलेल्या एका कॉम्रेडनें बातमी आणली कीं ता. २९ मार्च रोजीं सकाळीं या चार कॉम्रेडसना फांशी देण्यांत आले. दुसऱ्या दिवशीं आपल्याला फांशी देणार आहेत, असें त्याना आदल्या रात्रींच कळले होते. ती सगळी रात्र त्यानीं सगळ्यांनीं मिळून देशभक्तीची गाणीं गाण्यांत व घोषणा ओरडण्यांत घालविली.

**" कम्युनिस्ट पार्टी झिंदाबाद " ही घोषणा त्यांत वारंवार व सर्वांत जोरानें येत होती.** कान्ननूर सेंट्रल जेलमधील कोणच्याही राजकीय अगर इतर कैद्याला त्या रात्रीं झोप आली नाहीं.

दुसरे दिवशीं सकाळीं जेलच्या दरवाजावर त्यांची प्रेते मागण्यासाठीं ३००० नागरिकांचा जमाव जमला होता. ही पण विनंती देखील नाकारण्यांत आली.

**मलबारच्या किसानांनी या चार अमर पुत्रांना जन्म दिला. हंसत हंसत लीलेने आत्मसमर्पण करणाऱ्या या नररत्नांना पार्टीने वाढविले व मोठे केले. या दिवंगत हुतात्म्यांच्या चरणीं आमचे लाल प्रणाम !!**

★ ★ ★

# कय्यूर हुतात्म्यांच्या गौरवार्थ पार्टीला देणग्या

**वरील लेख वाचतांक्षणींच तीन देशभक्तांनीं पार्टीला देणग्या दिल्या आहेत. एका बंगाली देशभक्तानें आपली १००० रु. ची देणगी देतांना ' ज्या पार्टीत अशा प्रकारचे वीर निर्माण होतात त्या पार्टीला अर्पण ' असे उद्गार काढले. मुंबईच्या दोन नागरिकांनीं प्रत्येकीं १०० रु. च्या देणग्या देऊन कय्यूर हुतात्म्यांचा गौरव केला.**

# मृत्यूच्या उंबरठ्यावरून
# कय्यूर कम्युनिस्टांची हांक

**( कय्यूरच्या वीरांची फांशीची सजा कायम झाल्यानंतर त्यांनीं हिंदी कम्युनिस्ट पार्टीचे जनरल सेक्रेटरी कॉ. पी. सी. जोशी यांना पाठवलेलें पत्र )**

कम्युनिस्ट पार्टीवरील बंदी उठविल्याची बातमी ऐकून आम्हांला आनंद होत आहे. आपले सर्व कॉम्रेडस लवकरच सुटणार आहेत व जनतेच्या सहवासांत आपल्या कर्तव्यस्थानीं खडे होण्याची संधि त्यांना पुन: मिळणार आहे हें ऐकून सुद्धां आम्हांला आनंद होत आहे. तुमच्या स्फूर्तिदायक पुढारीपणाखालीं गेलीं कांहीं वर्षे काम करण्याचें भाग्य आम्हांला लाभलें. राष्ट्रीय एकजूट घडवून आणण्यांत व आपल्या पुरातन देशाला आजच्या गंभीर आपत्तीतून वाचविण्यांत हिंदी कम्युनिस्टांना यश येईल असा आम्हांला पूर्ण विश्वास वाटतो. आपलें ध्येय तडीस नेण्यासाठीं देशभर जी मोहीम सुरू करण्यांत आली आहे तिच्या बातम्या ऐकून आम्हांला स्फुरण चढत आहे, आमच्यांत धैर्य निर्माण होत आहे. पार्टीनें व जनतेनें आमच्यावर जो विश्वास टाकला आहे तो आम्हीं अखेरच्या क्षणापर्यंत खरा ठरवूं, असें आम्हीं तुम्हांला आश्वासन देतों. जर जनतेच्या चळवळी-मुळें आमचे प्राण वांचले, तर आम्हांला जेथें पाठविणें तुम्हांला जरूर वाटेल तेथें जाण्यास व आम्हांला जें काम तुम्हीं द्याल तें पार पाडण्यास आम्हीं तयार आहोंत असेंहि आम्हीं तुम्हांला आश्वासन देतों. केवळ आयुष्याचा लोभ सुटत नाहीं, म्हणूनच जगायचें, अशा वृत्तीची माणसें आम्हीं नव्हत. रानटी फॅसिस्टांच्या हल्ल्यापासून आपल्या मातृभूमीचा बचाव करण्यासाठीं जास्तींत जास्त परिणामकारक रीतीनें आमच्या प्राणाचें बलिदान कसें करतां येईल, हीच तळमळ आम्हांला लागून राहिली आहे. शत्रूचे शक्य तितके लोक गारद करण्याची संधि आज आमच्याकडून हिरावून घेण्यांत आली आहे, शत्रूच्या सैतानी कारवाया हाणून पाड-ण्याची संधि आम्हांला नाकारण्यांत आली आहे, आणि अशा प्रकारचा मृत्यु पत्करण्याची पाळी आल्यामुळें आज आमचा आशाभंग झाला आहे. आम्हीं तुम्हांला कळवूं इच्छितों कीं जर लष्करी अधिकाऱ्यांनीं सैनिकांचें 'जोहार-दळ' (सुइसाइड स्कॉड) तयार करण्याचें ठरविलें व त्यांत सामील होण्यास आम्हीं लायक आहोंत असें जर तुम्हांला वाटलें तर आम्हीं अशा प्रकारचें कार्य कम्युनिस्ट उत्साहानें पत्करूं.

क्रांतिकारक अभिवादन !

(सह्या) **१ मडत्तिल अप्पू २ पोडारा कुंयंबू नायर**
**३ चिरूकंडन ४ अबूबकर**

# मृत्यूच्या दारांतून कय्यूर कॉम्रेडसचा स्फूर्तिदायक संदेश

**व्हाइसरायने**सुद्धां आमचा दयेचा अर्ज फेटाळला आहे ही बातमी तुम्हांला कळली असेलच. फांशीचा दोर आतां आमच्या मानेभोवती पूर्वींपेक्षां जास्त घट्ट आवळला आहे. ही बातमी इतरांना अर्थात्‌च दुःखदायक वाटेल, पण आम्हांला तिच्यामुळे अत्यानंदच होत आहे. आतां फक्त प्रिव्ही कौन्सिलांतील अपील उरलें आहे. या अपिलाचा अखेरीस काय निकाल लागणार याची आम्हांला पर्वा नाहीं, आमच्यावर आमची स्वतःची मालकी नसून जगांतील जनतेचीच मालकी आहे. स्वदेशासाठीं मरण पत्करण्यांत आम्हांला अभिमान वाटतो. आम्हीं भागूबाई आहोंत असें समजूं नका; सच्चे देशभक्त व हुतात्मे म्हणून मृत्यूला निर्भयपणें मिठी मारण्यास आमची पूर्ण तयारी आहे. आम्हीं फांशीं गेल्यास इतिहासांत आमचा त्याग अजरामर होईल. आम्हांला हें विशेष भाग्य लाभलें आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं प्राणाचें बलिदान करण्याची संधि मिळाल्याबद्दल आम्हांला अभिमान वाटत आहे. तुरुंगांतील आमच्या जीवनाचा उरलेला प्रत्येक क्षण आनंदानें पवित्र मातृभूमीचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत आम्हीं घालवीत आहोत. **भगतसिंगा**-सारख्या देशभक्तांचें तेजस्वी बलिदान आम्हांला स्फुरण देत आहे. यशस्वी क्रांतीच्या मार्गें झारशाहीला मूठमाती देण्यापूर्वी जागतिक कामगारवर्गाचा पुढारी **कॉ. लेनीन** याला किती अनंत अपेष्टा सोसाव्या लागल्या याचीहि आम्हांला आठवण आहे.

कॉ. कुमारमंगलम् यांचें एक पत्र आम्हांला मिळालें. प्रिव्ही कौन्सिलांत आमचें अपील दाखल झालें आहे व आमचे प्राण वांचविण्यासाठीं एकंदर जनता व विशेषतः आपली कम्युनिस्ट पार्टी जिवापाड प्रयत्न करीत आहे, हें या पत्रावरून आम्हांला कळलें. आमची भेट घेण्यासाठीं वरचेवर येणाऱ्या केरळप्रांतीय कॉम्रेडसकडूनहि हीच बातमी आम्हांला मिळाली.

**फॅसिझमचा नायनाट करण्यासाठीं, भावी जगाला आक्रमणापासून वांचविण्यासाठीं, दुबळ्यांवर प्रबळांनीं सत्ता चालविण्याची प्रथा नष्ट करण्यासाठीं, आपल्या देशांतील जनतेची एकजूट घडवून आणण्याचा व संयुक्त राष्ट्रांच्या जनतेशीं तिचें सहकार्य घडवून आणण्याचा जिवापाड प्रयत्न आपल्या कॉम्रेडसनीं चालविला आहे, हें ऐकून आम्हांला अत्यंत आनंद होतो.**

**जपानी पशूंविरुद्ध लढण्याच्या कार्यांत, मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याच्या कार्यांत, आम्हांला आपला हिस्सा पार पाडतां येत नाहीं, याबद्दल आम्हांला वाईट वाटतें.**

**आपल्या कॉम्रेडसनी कसोशीनें व कळकळीनें काम करून जनतेला आदर्श व्हावें, तिच्यांत धैर्य निर्माण करावें, व देशहितासाठीं एकजूट कर-ण्याचा व सर्वस्वाचा होम करण्याचा उत्साह तिच्यांत उत्पन्न करावा, अशी त्यांना आम्ही तुरुंगांतून कळकळीची विनंति करीत आहोंत.**

आम्हांला कांहीं चिंता वाटत नाहीं. आमचें धैर्य खचलेलें नाहीं. आपल्या देशांतील अनेक शूर हुतात्म्यांचा इतिहास आमच्या डोळ्यांसमोर आहे व म्हणून देशहितासाठीं धैर्यानें मृत्यूला कवटाळण्यास आम्हांला स्फुरण मिळत आहे. जगांतील सर्व राष्ट्रांतील जनता अखेरीस विजयी होईल व जगाचा उज्ज्वल भविष्यकाळ सुरू होईल असा आमचा दृढ विश्वास आहे.

**वाटेल तें करून राष्ट्रीय एकजूट घडवून आणा, देशाच्या उद्धाराचा एकमेव मार्ग हाच होय.**

क्रांति चिरायु होवो ! कम्युनिस्ट पार्टी चिरायु होवो ! इन्कलाब जिंदाबाद !

लाल सलाम

सह्या:—(१) **मढत्तिल अप्पू.**
(२) **चिरुकंदन.**
(३) **अबू बकर.**
(४) **कुंयंबू नायर.**

# कय्यूर कुटुंबांना मदत करा

कय्यूर हुतात्म्यांच्या कुटुंबांच्या मदतीसाठीं हिंदी कम्युनिस्ट पार्टीनें कय्यूर रिलीफ फंड उघडला आहे. ज्या कय्यूर वीरांनीं देशासाठीं आपले बहुमोल प्राण अर्पण केले त्यांच्या कुटुंबांना यथाशक्ति मदत करणें हें प्रत्येक हिंदी देशभक्तांचें कर्तव्य होय. या कुटुंबांच्या मदतीसाठीं द्यावयाच्या देणग्या खालील पत्त्यावर पाठवाव्यात.

पत्ता:—केरळ कम्युनिस्ट पार्टी कचेरी, टी. बी. रोड, कालिकत.

# ब्रिटनमध्यें कय्यूर मदत फंड

मि. डी. एन. प्रिट, रेजिनाल्ड ब्रिजमन, रे. सोरेन्सन, रे. गॉर्डन् लिव्हिंग्स्टन, पी. जी. बार्स्टो, लॉर्ड स्ट्राबोल्गी व ब्रिटनमधील हिंदुस्तानचे इतर दोस्त यांनीं चार कय्यूर कॉमरेडसच्या कुटुंबांना मदत म्हणून फंड उभारण्याचें ठरवलें आहे अशी कॉ. बेन ब्रॅडले यांची तार आली आहे. आजवर ब्रिटिश कम्युनिस्टांनीं व हिंदुस्तानच्या इतर दोस्तांनीं कय्यूरच्या कॉम्रेडससाठीं कित्येक वेळां खटपट केली आहे. त्यांचे प्रिव्ही कौन्सिलपुढें अपील चालवण्यास सुप्रसिद्ध बॅरिस्टर व पार्लमेंटचे सभासद मि. डी. एन. प्रिट यांची मदत ब्रिटिश कम्युनिस्ट पार्टीनेंच मिळवली. अपील फेटाळलें जाऊन व्हाइसरॉयनें दयेचा अर्ज नाकारतांच या बाबतींत ब्रिटिश सरकारनें मध्यस्ती करावी अशी मागणी पार्लमेंटचे कांहीं मजूर सभासद व धर्मगुरू यामार्फत करण्याची त्यांनींच तरतूद केली. हे प्रयत्न निष्फळ ठरून कय्यूरचे वीर फांशीं जातांच आतां ब्रिटनमधील हिंदुस्थानच्या दोस्तांनीं मदत फंडाचें कार्य हातीं घेऊन स्वातंत्र्यप्रेमी हिंदी व ब्रिटिश जनता यांमधील एकीचा दुवा जोडला आहे.



" थोर हुतात्म्यांचे अनुकरण करण्याची संधि मिळाल्याबद्दल मला अत्यंत अभिमान वाटत आहे. माझ्या धाकट्या भावांना पार्टीत सामील करून घ्या ".

--अबू बकर



" पार्टीनेंच मला जनतेची सेवा करण्यास शिकविलें. मी माझे कर्तव्य पार पाडलें, असें पार्टीला वाटत असेल तर मी स्वतःला धन्य समजेन. "

--कुंयंबू नायर

Department

# सोविएत यूनियन कम्युनिस्ट पार्टीचा इतिहास

**किंमत ३॥ रुपये** ( टपाल खर्च निराळा )

क्रांतिकारक चळवळ हीच क्रांतीची शाळा असें आपण म्हणतो. प्रत्येक शाळेत जशी क्रमिक पुस्तके लागतात तसेच क्रांतीच्या शाळेंत शिकणाऱ्यांना क्रांतिकारक क्रमिक पुस्तकांची गरज असते. म्हणूनच सोविएत यूनियन कम्युनिस्ट पार्टीच्या मध्यवर्ती कमिटीनें १९३७ सालीं आपल्या पार्टीच्या २ लाख सभासदांना व ४ लाख तरुण कम्युनिस्टांना क्रांतीचे मूलभूत शिक्षण देण्यासाठीं एक आदर्श ग्रंथ तयार करण्याचे ठरविले. सोविएत यूनियन कम्युनिस्ट पार्टीचा इतिहास हाच तो आदर्श ग्रंथ होय. हा ग्रंथ तयार करण्यासाठीं कॉ. स्टालिनच्या नेतृत्वाखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. १९३८ सालीं हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या ग्रंथाचे अधिकृत मराठी भाषांतर मे दिनाला प्रसिद्ध झाले आहे. आज क्रांतिकारक चळवळींत सामील होणाऱ्या हजारों कामगारांना, किसानांना व तरुण विद्यार्थ्यांना क्रांतीचें मूलभूत ज्ञान मिळण्याच्या दृष्टीनें हें पुस्तक अतिशय उपयुक्त आहे.

**प्रती थोड्याच शिल्लक आहेत. ताबडतोब मागणी करा.**

व्यवस्थापक--लोक-प्रकाशन संस्था,

**१९० बी खेतवाडी, मेन रोड मुंबई, नं. ४**